SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- ONE

Thursday, the 6th July, 2023

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ७३ (३)] बुधवार, मे ३१, २०२३/ज्येष्ठ १०, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २१२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मे २०२३.

अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.

क्रमांक संकिर्ण-२०२३/ प्र.क्र.९८/ विशि-३.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ६) याच्या कलम ७२ च्या पोट-कलम (१०) यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून कलम १२३ ची पोट-कलमे (२) व (३) मधील तरतूदीनुसार, महाराष्ट्र शासन, याद्वारे, स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्याची व तो चालू ठेवण्याची मानके व कार्यपद्धती, प्राधिकरणे व मंडळे गठित करणे आणि अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयांचे अधिकार व कार्ये यांच्याशी संबंधित असणारे पुढील एकरूप परिनियम विहित करीत आहे.—

२०२३ चा एकरूप परिनियम क्रमांक १

१. संक्षिप्त नाव, प्रयुक्ति व प्रारंभ.—

(१) या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्याची व तो चालू ठेवण्याची मानके व कार्यपद्धती, प्राधिकरणे व मंडळे गठित करणे आणि अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयांचे अधिकार व कार्ये) एकरूप परिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) हे परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ६) याखालील, महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठांच्या अधिकारप्रदत्त स्वायत्त दर्जा प्रदान करण्याची मागणी करणाऱ्या, सर्व संलग्न स्वायत्त महाविद्यालयांना लागू असतील.

(३) हे परिनियम, **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये** ही अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून, अंमलात येतील.

२. पात्रता.-

जर एखाद्या संलग्न स्वायत्त महाविद्यालयास,—

(१) राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने, ३.०१ किंवा त्यापेक्षा अधिक संचयी श्रेणी श्रेयांक सरासरीसह वैध मानांकन दिलेले असेल किंवा त्या महाविद्यालयाद्वारे राबविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमांपैकी किमान साठ टक्के अभ्यासक्रमांना, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाकडून अधिस्वीकृती किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाने नामिकाप्रविष्ट केलेल्या कोणत्याही अभिकरणाकडून तत्सम अधिस्वीकृती श्रेणी देण्यात आलेली असेल तर; आणि

(२) संलग्न स्वायत्त महाविद्यालय म्हणून ते किमान पाच वर्षांपासून कार्यरत असेल तर,

त्या संलग्न स्वायत्त महाविद्यालयाचे व्यवस्थापन, अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्यासाठी, विद्यापीठाकडे अर्ज करण्यास पात्र असेल.

३. अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्याची कार्यपद्धती.—

(१) अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळण्याची इच्छा असणारे संलग्न स्वायत्त महाविद्यालय, यासोबत जोडलेल्या जोडपत्रामध्ये विहित केलेल्या नमुन्यात विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुकडे पंचवीस हजार रुपये शुल्कासह अर्ज करील, जे प्रत्येक दहा वर्षांनंतर पन्नास टक्क्यांनी वाढविण्यात येईल.

(२) संलग्न स्वायत्त महाविद्यालय, ज्या वर्षापासून ते अधिकारप्रदत्त स्वायत्त दर्जा मिळवू इच्छित आहे, त्या वर्षाच्या ३१ मे पूर्वी अर्ज करील.

(३) (क) कुलगुरु, एका शैक्षणिक वर्षामध्ये प्राप्त झालेल्या अर्जांची तपासणी करण्यासाठी पुढील सदस्यांचा समावेश असलेली एक तज्ज्ञ समिती घटित करील :—

(एक) विद्यापीठाचा प्र कुलगुरु - अध्यक्ष;

(दोन) विद्यापीठाच्या विद्यापरिषदेने नामनिर्देशित केलेल्या तज्ज्ञांच्या नामिकेतील जे तज्ज्ञ, विख्यात शिक्षणतज्ज्ञ किंवा वैज्ञानिक किंवा उद्योगपती असतील असे तीन तज्ज्ञ;

(तीन) संलग्न स्वायत्त महाविद्यालयाचा प्राचार्य किंवा माजी प्राचार्य किंवा स्वायत्त मान्यताप्राप्त परिसंस्थेचा संचालक किंवा माजी संचालक;

(चार) विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचा उप कुलसचिव, तज्ज्ञ समितीचा सचिव म्हणून काम करील.

(ख) तज्ज्ञ समितीचे नामनिर्देशित सदस्य, अधिष्ठाता मंडळाचे सदस्य असणार नाहीत.

(ग) तज्ज्ञ समिती, अशा सर्व अर्जांची छाननी करील आणि तिला उचित वाटतील अशा संबद्ध कारणांनी यथोचितरीत्या पुष्टी दिलेल्या अशा शिफारशींसह त्याबाबतचा अहवाल अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत कुलगुरुला सादर करील.

(४) तज्ज्ञ समितीचा अहवाल, कुलसचिवाद्वारे, विद्यापरिषदेच्या विचारार्थ, तिच्यासमोर ठेवण्यात येईल.

(५) विद्यापरिषद, तज्ज्ञ समितीच्या अहवालासह अशा महाविद्यालयास अधिकारप्रदत्त स्वायत्त दर्जा देण्याच्या अशा अर्जाचा विचार करील आणि तिच्या शिफारशी, व्यवस्थापन परिषदेकडे करील.

(६) व्यवस्थापन परिषदेस, विद्यापरिषदेच्या शिफारशी विचारात घेतल्यानंतर अशा महाविद्यालयास स्वायत्त दर्जा प्रदान करता येईल किंवा कारणे नमूद करून अर्ज नाकारता येईल.

(७) विद्यापीठाचा प्र-कुलगुरु, अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा दिल्यासंबंधीचा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचा निर्णय, अधिसूचित करील व संबंधित अर्जदार संलग्न स्वायत्त महाविद्यालयास कळवील. व्यवस्थापन परिषदेने, अर्ज नाकारण्याचे ठरविले तर, प्र-कुलगुरु, असा अर्ज नाकारण्याच्या कारणांसह अर्ज नाकारल्याबद्दल, अर्जदारास कळवील.

(८) एकदा अर्ज नाकारल्यावर, विद्यापीठ, असा अर्ज नाकारल्याच्या दिनांकापासून एक वर्ष समाप्त होण्यापूर्वी, उक्त संलग्न स्वायत्त महाविद्यालयाचा नवीन अर्ज विचारात घेणार नाही.

(९) अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाच्या दर्जा देण्याची संपूर्ण प्रक्रिया, पूर्ण करण्यात येईल आणि अशा अर्जा त्यानंतर केला असेल त्या वर्षाच्या ३० जून रोजी किंवा त्यापूर्वी, संबंधित संलग्न स्वायत्त महाविद्यालयास, त्याप्रमाणे कळविण्यात येईल.

(१०) जर विद्यापीठाने, संबंधित संलग्न स्वायत्त महाविद्यालयास अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्याबद्दलचा त्याचा निर्णय उप-खंड (९) मध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेच्या आत, कळविण्यात कसूर केली तर, संबंधित संलग्न स्वायत्त महाविद्यालयास, विद्यापीठाद्वारे अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्रदान करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

४. अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्याचा कालावधी.-

संलग्न स्वायत्त महाविद्यालयास, सुरुवातीला एका वेळी दहा वर्षांच्या कालावधीकरिता अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्यात येईल. खंड ३ मधील विहित केलेल्या कार्यपद्धतीस आणि नमूद केलेल्या कालमर्यादेस अधीन राहून, दहा वर्षांच्या पुढील कालावधीकरिता तो चालू ठेवता येईल.

५. अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाची प्राधिकरणे व मंडळे गठित करणे.–

अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाची प्राधिकरणे किंवा मंडळे ही, स्वायत्त दर्जा असणाऱ्या महाविद्यालयांकरिता, वेळोवेळी, विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केल्याप्रमाणे असतील.

६. अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचे अधिकार व कार्ये.–

(१) अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालय, विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वायत्त दर्जा असलेल्या महाविद्यालयांकरिता, वेळोवेळी, विहित केलेल्या अधिकारांचा वापर करील आणि कार्ये पार पाडील आणि प्रशासकीय, विद्याविषयक, वित्तीय व इतर कार्ये करील.

(२) अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाला, विद्यापीठाशी संलग्नता असलेली संयुक्त पदवी प्रदान करण्याचा अधिकार प्रदान केला आहे, पदवी प्रमाणपत्रावर, संलग्न विद्यापीठाचे व अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचे नाव व चिन्हे (लोगो) असतील.

(३) अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालय, राज्य शासनाने व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या स्वायत्त महाविद्यालय वापरीत असलेल्या विशेषाधिकारांशिवाय, अशा सर्व विशेषाधिकारांचा वापर करील.

७. सर्वसाधारण तरतुदी.–

(१) विद्यार्थ्यांना अंशतः एका अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयामध्ये आणि अंशतः दुसऱ्या अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयामध्ये किंवा अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांमध्ये अभ्यासक्रमाचे अध्ययन करता येईल.

(२) अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालय, संबंधित विद्यापीठाची संलग्नता चालू ठेवील.

(३) अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांच्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना, संबंधित पाठ्यक्रमास त्यांनी प्रवेश घेतल्याचे दिनांक लक्षात न घेता, संलग्न विद्यापीठ व अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांची नावे व चिन्हे (लोगो) असणारे संयुक्त पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

(४) विद्यापीठ अनुदान आयोग (महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा प्रदान करणे आणि स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा राखण्याच्या उपाययोजना) विनियम, २०२३ यानुसार विहित केलेल्या स्वायत्त संलग्न महाविद्यालयांना, लागू असलेल्या सर्व तरतुदी, वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे, अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयांना लागू असतील.

(५) राज्य शासन, अधिकारप्रदत्त स्वायत्त दर्जा प्रदान करण्यापूर्वी शासन अनुदानित अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयांना जी अनुदाने किंवा निधी देण्यात येत होती तीच अनुदाने किंवा निधी त्यांना देण्याचे चालू ठेवील.

जोडपत्र

अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्याबाबतच्या अर्जाचा नमुना

[खंड ३ (१) पहा]

अनु. क्रमांक	तपशील	माहिती	
१	संलग्न स्वायत्त महाविद्यालयाचे नाव व पत्ता		
२	संपर्काचा तपशील (दूरध्वनी क्रमांक, ईमेल, इत्यादी.)		
३	संलग्नता असणारे विद्यापीठ		
४	संलग्न स्वायत्त महाविद्यालयाच्या स्थापनेचे वर्ष		
५	राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेची (नॅक) अधिस्वीकृती (प्रत जोडावयाची आहे)	वैधतेचा कालावधी	श्रेणी
६	राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाची (एनबीए) अधिस्वीकृती (प्रत जोडावयाची आहे)	वैधतेचा कालावधी	श्रेणी
७	इतर कोणत्याही अधिस्वीकृती अभिकरणाने दिलेली अधिस्वीकृती (प्रत जोडावयाची आहे)	वैधतेचा कालावधी	श्रेणी
८	स्वायत्त संलग्न महाविद्यालयाचा प्रकार (शासकीय/ खाजगी अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित)		
९	संलग्न स्वायत्त महाविद्यालयाद्वारे चालविण्यात येणाऱ्या पाठ्यक्रमांचा तपशील	पाठ्यक्रम	कालावधी
१०	अधिकारप्रदत्त स्वायत्त दर्जा देण्याकरिता प्रदान केलेल्या शुल्काचा तपशील		

स्वायत्त संलग्न महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचा अध्यक्ष/सचिव,

.....

(स्वाक्षरी व मोहोर).

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विकास चंद्र रस्तोगी,
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

[illegible]

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष २, अंक ७२ (२)] बुधवार, दि. ३१, २०२३/पौष १०, शके १९४५ [किंमत : रुपये [illegible]

असाधारण क्रमांक ३१२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांमध्ये जमा केलेले

(भाग एक, एक-अ आणि एक-ब यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मे २०२३

अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.

क्रमांक सकीर्ण-२०२३/प्र.क्र.२८/ विशेष-३.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ६) याच्या कलम ७२ चया पोट-कलम (१अ) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक ३ जून २०२३ रोजी पोट-कलमे (२) व (३) यांतील तरतुदींनुसार, महाराष्ट्र शासन, याद्वारे, संबंधित महाविद्यालयांना अधिकारप्राप्त संचालक समूह परिसंस्थेचा दर्जा देण्याची व तो चालू ठेवण्याची मानके व कार्यपद्धती, प्राधिकरणे व मार्गदर्शक तत्त्वे आणि अधिकारप्राप्त संचालक समूह परिसंस्थेचे अधिकार व कार्ये याच्याशी संबंधित असलेले पुढील एकत्रित परिनियम विहित करीत आहे —

२०२३ चा एकत्रित परिनियम क्रमांक २

१. **संक्षिप्त नाव, प्रस्तावना व प्रारंभ.**—

(१) या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (संबंधित महाविद्यालयांना अधिकारप्राप्त संचालक समूह परिसंस्थेचा दर्जा देण्याची व तो चालू ठेवण्याची मानके व कार्यपद्धती, प्राधिकरणे व मार्गदर्शक तत्त्वे आणि अधिकारप्राप्त संचालक समूह परिसंस्थेचे अधिकार व कार्ये) एकत्रित परिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) हे परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ६) यास्तव, महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठांच्या अधिकारप्राप्त संचालक समूह परिसंस्थेचा दर्जा प्रदान करण्याची मानके, कार्यपद्धती, संबंधित संचालक महाविद्यालयांना लागू असतील.

(३) हे परिनियम, महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये ही अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून, अमलात येतील.

२. **पात्रता.—**

जर संलग्न स्वायत्त महाविद्यालयांस किंवा मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्थेस,—

(१) राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने, ३.०१ किंवा त्यापेक्षा अधिक संचयी श्रेणी श्रेयांक सरासरीसह वैध मानांकन दिलेले असेल किंवा त्या महाविद्यालयाद्वारे किंवा परिसंस्थेद्वारे राबविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमांपैकी किमान साठ टक्के अभ्यासक्रमांना, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाकडून अधिस्वीकृती किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाने नामिकाप्रविष्ट केलेल्या कोणत्याही अभिकरणाकडून तत्सम अधिस्वीकृती श्रेणी देण्यात आलेली असेल तर; आणि

(२) संलग्न स्वायत्त महाविद्यालय किंवा स्वायत्त मान्यताप्राप्त परिसंस्था म्हणून ते किमान पाच वर्षांपासून कार्यरत असेल तर,

त्या संलग्न स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा स्वायत्त मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या गटाचे व्यवस्थापन, अशा संलग्न स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्थांच्या गटाला अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा देण्यासाठी, विद्यापीठाकडे अर्ज करण्यास पात्र असेल.

३. **अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा देण्याची कार्यपद्धती.—**

(१) अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा मिळण्याची इच्छा असणारा संलग्न स्वायत्त महाविद्यालयांचा किंवा स्वायत्त मान्यताप्राप्त परिसंस्थांचा गट, यासोबत जोडलेल्या जोडपत्रामध्ये विहित केलेल्या नमुन्यात विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुकडे पंचवीस हजार रुपये शुल्कासह अर्ज करील, जे प्रत्येक दहा वर्षांनंतर पन्नास टक्क्यांनी वाढविण्यात येईल.

(२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्याची व तो चालू ठेवण्याची मानके व कार्यपद्धती, प्राधिकरणे व मंडळे गठित करणे आणि अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयांचे अधिकार व कार्ये) एकरूप परिनियम, २०२३, यात विहित केलेली कार्यपद्धती, संलग्न महाविद्यालयांच्या किंवा स्वायत्त मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या गटास अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा देण्यासाठी, योग्य त्या फेरफारांसह, लागू असेल.

४. **अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा देण्याचा कालावधी.—**

संलग्न स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा मान्यताप्राप्त स्वायत्त समूह परिसंस्थांच्या गटास सुरूवातीला एका वेळी दहा वर्षांच्या कालावधीकरिता अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा देण्यात येईल. खंड ३ मधील विहित केलेल्या कार्यपद्धतीस आणि नमूद केलेल्या कालमर्यादेस अधीन राहून, दहा वर्षांच्या पुढील कालावधीकरिता तो चालू ठेवता येईल.

५. **अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा चालू ठेवणे.—**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महविद्यालयाचा दर्जा देण्याची व तो चालू ठेवण्याची मानके व कार्यपद्धती, प्राधिकरणे व मंडळे गठित करणे आणि अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयांचे अधिकार व कार्ये) एकरूप परिनियम, २०२३, यात विहित केलेली कार्यपद्धती, संलग्न स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा त्याच व्यवस्थापनाच्या मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या गटास, अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा देण्यासाठी योग्य त्या फेरफारांसह लागू असेल.

६. **अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांची प्राधिकरणे व मंडळे गठित करणे.—**

अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांची प्राधिकरणे किंवा मंडळे ही, स्वायत्त दर्जा असणाऱ्या महाविद्यालयांकरिता, वेळोवेळी, विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केल्याप्रमाणे असतील.

७. **अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचे अधिकार व कार्ये.—**

(१) अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्था, विद्यापीठ अनुदान आयोगाने, स्वायत्त दर्जा असलेल्या महाविद्यालयांसाठी वेळोवेळी विहित केलेल्या अधिकारांचा वापर करील आणि कार्ये पार पाडील आणि प्रशासकीय, विद्याविषयक, वित्तीय व इतर कार्ये करील.

(२) अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांना, विद्यापीठाशी संलग्नता असलेली संयुक्त पदवी प्रदान करण्याचा अधिकार प्रदान केला आहे. पदवी प्रमाणपत्रावर, संलग्न विद्यापीठाचे व अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचे नाव व चिन्हे (लोगो) असतील.

(३) अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्था, स्वायत्त संलग्न महाविद्यालय किंवा स्वायत्त मान्यताप्राप्त परिसंस्था वापरीत असलेल्या विशेषाधिकारांशिवाय, राज्य शासनाने व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या अशा सर्व विशेषाधिकारांचा वापर करील.

८. **सर्वसाधारण तरतुदी.–**

(१) विद्यार्थ्यांना, अंशतः एका अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांमध्ये आणि अंशतः इतर दुसऱ्या अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांमध्ये किंवा अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रमाचे अध्ययन करता येईल.

(२) अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्था, संबंधित विद्यापीठाची संलग्नता किंवा मान्यता चालू ठेवील.

(३) अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांच्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना, संबंधित पाठ्यक्रमास त्यांनी प्रवेश घेतल्याचे दिनांक लक्षात न घेता, संलग्न विद्यापीठ, व अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्था यांची नावे व चिन्हे (लोगो) असणारे संयुक्त पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

(४) स्वतंत्र स्वायत्त संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था, अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर, त्याची/तीची स्वतःची मूळ ओळख टिकवून ठेवील.

(५) स्वतंत्र संलग्न स्वायत्त महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्थेच्या अंतर्गत असलेल्या सफाई काम, सुरक्षा सेवा, ग्रंथालय, क्रीडा, प्रयोगशाळा, वाहनतळ, मैदान व वर्ग यांसारख्या सर्व सोयीसुविधा, अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांच्या एकाच छताखाली आणण्यात येतील. स्वतंत्र संलग्न स्वायत्त महाविद्यालयांतील किंवा मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्थांमधील सोयीसुविधांचा, अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थामधील विद्यार्थ्यांच्या संपूर्ण लाभासाठी इष्टतम वापर करण्यात येईल, जेणे करून, स्वतंत्र संसाधनांवरील खर्च कमी होईल आणि सामाईक सुविधांचा, सर्व विद्यार्थ्यांना लाभ होईल.

(६) विद्यापीठ अनुदान आयोग (महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा प्रदान करणे आणि स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा राखण्याच्या उपाययोजना) विनियम, २०२३ यानुसार विहित केलेल्या स्वायत्त संलग्न महाविद्यालयांना, लागू असलेल्या सर्व तरतुदी, वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांना लागू असतील.

(७) राज्य शासन, शासन अनुदानित स्वायत्त संलग्न महाविद्यालयांना किंवा मान्यताप्राप्त संस्थांना अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा प्रदान करण्यापूर्वी, जी अनुदाने किंवा निधी देण्यात येत होता तीच अनुदाने किंवा निधी त्यांना देण्याचे चालू ठेवील.

जोडपत्र

अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांना दर्जा देण्याबाबतच्या अर्जाचा नमुना

[खंड ३ (१) पहा]

अ. क्र.	तपशील	माहिती	
१	प्रत्येक संलग्न स्वायत्त महाविद्यालयाचे / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्थेचे नाव व पत्ता		
२	संपर्काचा तपशील (दूरध्वनी क्रमांक, ई-मेल, इत्यादी.)		
३	संलग्नता असणारे विद्यापीठ		
४	प्रत्येक संलग्न स्वायत्त महाविद्यालयाचे / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था स्थापन केल्याचे वर्ष		
५	राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेची (नॅक) अधिस्वीकृती (प्रत जोडावयाची आहे) (प्रत्येक संलग्न स्वायत्त महाविद्यालय / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था यांची)	वैधतेचा कालावधी	श्रेणी
६	राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाची (एनबीए) अधिस्वीकृती (प्रत जोडावयाची आहे) (प्रत्येक संलग्न स्वायत्त महाविद्यालय / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था यांची)	वैधतेचा कालावधी	श्रेणी
७	इतर कोणत्याही अधिस्वीकृती अभिकरणाने दिलेली अधिस्वीकृती (प्रत जोडावयाची आहे) (प्रत्येक संलग्न स्वायत्त महाविद्यालय / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था यांची)	वैधतेचा कालावधी	श्रेणी
८	प्रत्येक संलग्न स्वायत्त महाविद्यालयाचा / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्थेचा प्रकार (शासकीय/ खाजगी अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित)		
९	संलग्न स्वायत्त महाविद्यालयाद्वारे / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्थेद्वारे चालविण्यात येणाऱ्या पाठ्यक्रमांचा तपशील	पाठ्यक्रम	कालावधी
१०	अधिकारप्रदत्त स्वायत्त दर्जा देण्याकरिता प्रदान केलेल्या शुल्काचा तपशील		

स्वायत्त संलग्न महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचा अध्यक्ष/सचिव,

.....

(स्वाक्षरी व मोहोर).

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विकास चंद्र रस्तोगी,
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ७३] बुधवार, मे ३१, २०२३/ज्येष्ठ १०, शके १९४५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २१०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मे २०२३.

अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.

क्रमांक संकिर्ण-२०२३/ प्र.क्र.९८/ विशि-३.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधिनियम क्र. ६) याच्या कलम ७२ चे पोट-कलम (१०) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून कलम ७१ चे पोट-कलम (७) तसेच कलम १२२ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन, याद्वारे, विद्यापीठांशी संलग्न असलेली महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था, संचालित महाविद्यालये व घटक महाविद्यालये यांना स्वायत्तता देण्याच्या मानकांशी संबंधित असणारे पुढील एकरूप परिनियम विहित करीत आहे :—

२०२३ चा एकरूप परिनियम क्रमांक ३

१. संक्षिप्त नाव व प्रयुक्ती.—

(१) या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था, संचालित महाविद्यालये व घटक महाविद्यालये यांना स्वायत्तता देण्याची मानके) एकरूप परिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) हे परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ खालील महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठांशी संलग्न असलेल्या स्वायत्त दर्जा प्रदान करण्याची मागणी करणाऱ्या, सर्व महाविद्यालयांना किंवा विद्यापीठांनी मान्यता दिलेल्या परिसंस्थांना किंवा विद्यापीठांच्या संचालित महाविद्यालयांना किंवा घटक महाविद्यालयांना लागू असतील.

२. स्वायत्त दर्जा प्रदान करण्याच्या तरतुदी आणि स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था यांच्यामधील दर्जा राखण्याच्या उपाययोजना.–

(१) विद्यापीठ अनुदान आयोग (महाविद्यालयांना स्वायत्त दर्जाचे प्रदान करणे आणि स्वायत्त महाविद्यालयांमधील दर्जा राखण्याच्या उपाययोजना) विनियम, २०२३ याच्या तरतुदी, तसेच यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा, स्वायत्त दर्जा प्रदान करण्याची मागणी करणाऱ्या विद्यापीठांशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांना, मान्यताप्राप्त परिसंस्थांना, संचालित महाविद्यालयांना व घटक महाविद्यालयांना लागू असतील.

(२) हे परिनियम, **महाराष्ट्र शासन राजपत्रात**, प्रसिद्ध केल्याच्या दिनांकास व तेव्हापासून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (संलग्न महाविद्यालयांना, मान्यताप्राप्त परिसंस्थांना व संचलित किंवा घटक महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याची मानके) एकरूप परिनियम, २०१८ (२०१९ चा एकरूप परिनियम क्रमांक ३) निरसित होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विकास चंद्र रस्तोगी,
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.